**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAR-APR, 2020, VOL- 7/58*

# कोरोना योद्ध्यांचे योगदान (Contribution of Corona warriors )

**राजेंद्र महादू आचार्य, Ph. D.**
*सहयोगी प्राध्यापक आणि मराठी विभागप्रमुख, द. ग. तटकरे महाविद्यालय,*
*माणगाव - रायगड ४०२१०४, acharyarajendra584@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १) प्रस्तावना

कोरोना विषाणूमुळे संपूर्ण विश्व हैराण आहे .या कोरोनाचा प्रसार आणि उगम चीनमधील वुहान येथून झाल्याचे सांगण्यात येत आहे .कोरोनाची उत्पत्ती आणि प्रसाराची कारणे शोधण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) काही प्रतिनिधींनी वुहानमध्ये जाऊन तपासणी केली. रिसर्चर पिटर इमरबॅक यांनी याबाबत अभ्यास केला आहे. त्यांनी केलेल्या दाव्यानुसार वुहान शहरात कोरोनाचा प्रसार डिसेंबर २०१९ मध्येच सुरू झाला. पिटर यांनी कोरोनाच्या जेनेटिक्सबद्दलही अभ्यास केला. पिटर यांनी सांगितल्याप्रमाणे वुहान येथे डिसेंबरमध्ये आढळलेल्या कोरोना व्हायरसचे तब्बल १३ वेगवेगळे प्रकार (Jenetic Sqance) दिसून आले, म्हणजेच चीनमध्ये डिसेंबरमध्ये कोरोनाचे वेगवेगळे १३ प्रकार समोर आले होते. तसेच युनिव्हर्सिटी ऑफ सिडनीचे व्हायरॉलॉजिस्ट एडवर्ड होम्स यांनी सांगितल्याप्रमाणे डिसेंबर २०१९ मध्ये कोरोनाचे तब्बल शंभर रुग्ण आढळले होते. दरम्यान कोरोना विषाणूचा उगम चीनमध्ये झाल्याचे सर्व दावे चीनने फेटाळले आहेत. तसेच मिलान कॅन्सर इन्स्टिट्यूटने सांगितल्याप्रमाणे कोरोना व्हायरसचा प्रसार २०१९ मधील ऑक्टोबर महिन्यात सुरू झाला होता. ऑक्टोबर महिन्यात इटलीमध्ये कोरोनाचे काही रुग्ण आढळून आल्याचा अंदाज या इन्स्टिट्यूटने व्यक्त केला आहे. असे असले तरी सरकारी कागदपत्रांनुसार चीनमध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण १७ नोव्हेंबर २०१९ मध्ये आढळला.

भारतातील कोरोना विषाणूचा पहिला रुग्ण जानेवारी २०२० मध्ये आढळून आला. पण मार्च २०२० पासून संसर्ग वेगाने वाढू लागला. मार्च महिना अखेरपर्यंत १४०० जणांना कोरोनाची लागण झाली होती तर ३५ जणांचा मृत्यू झाला होता. सुरुवातीपासूनच दिल्ली, महाराष्ट्र, केरळ, राजस्थान आणि गुजरात या राज्यांमध्ये कोरोनाचा प्रसार वेगाने झाला. या राज्यातील काही विशिष्ट ठिकाणी कोरोनाचा कहर सर्वाधिक होता ती ठिकाणं Corona Hotspot म्हणून घोषित करण्यात येत होते. त्यामध्ये निजामुद्दीन, दिलशाद गार्डन, नोएडा, मिरठ, भीलवाडा, अहमदाबाद, मुंबई, कासरगोंड आणि पथानामथिट्टा इत्यादी शहरांचा समावेश होतो. कोरोना व्हायरसचा झपाट्याने होणारा प्रसार पाहून २८ मार्चला जनता कर्फ्यू लावण्यात आला. तर २५ मार्च (२४मार्चच्या मध्यरात्रीपासून) लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**२) लॉकडाऊन म्हणजे नक्की काय ?**

चीनमधील वुहानमधून कोरोनाचा वायरस जगभर पसरला फक्त चीनच नव्हे तर पाहता पाहता संपूर्ण जगभर या कोरोनाने हाहाकार माजविला. घड्याळाच्या काट्यावर धावणारे जग अक्षरशः जागेवरच थांबले. याच परिस्थितीतून भारतही जात होता. अत्यंत संघर्षाच्या या काळात देश आणि देशवासीयांना प्रथम प्राधान्य देत माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देश लॉकडाऊन करत असल्याचं जाहीर केले. संपूर्ण देशावर कोरोनाचे संकट असताना परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. मुख्य म्हणजे देशभरात हा निर्णय लागू होण्यापूर्वीच अनेक जिल्हे, राज्यांनी लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रामध्ये २३ मार्च २०२० ला जमावबंदीने फरक पडत नसल्याचे पाहून संपूर्ण राज्यात संचारबंदी (कलम१४४) लागू करण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी केली. राज्याच्या सर्व सीमा सील करण्याचा निर्णय सरकारने घेतला.

लॉकडाऊन (टाळेबंदी) हा पर्याय अतिशय दुर्मिळ वेळा स्वीकारला जातो. यामध्ये नागरिकांना आपला परिसर सोडून दुसरीकडे स्थलांतरीत केले जाते किंवा घरातून बाहेर पडण्यास मज्जाव केला जातो. हा निर्णय किती कालावधीसाठी घ्यायचा हे त्या ठिकाणच्या परिस्थितीवर अवलंबून असते. यामध्ये अनेक व्यवहार ठप्प केले जातात, वाहतुकीवरही त्याचा थेट परिणाम दिसून येतो. या निर्णयानंतर नागरिकांनी घराबाहेर न पडता घरातच राहणं अपेक्षित आणि बंधनकारक असते. यावेळी फक्त वैद्यकीय आणि अत्यावश्यक सेवा मात्र सुरू राहतात. Epidemic Disease Act १८९७ अंतर्गत परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी सरकार जनतेला गरजेचे सल्ले, आदेश देऊ शकतं. सरकारकडून आखून दिले गेले नियम न पाळल्यास हजारोंच्या जीवाला धोका पोहोचू शकतो. लॉकडाऊन करण्यात आलेल्या सर्व ठिकाणी कार्यालये, दुकाने, मॉल, कॅफे, सामुदायिक केंद्र बंद राहतात. चारपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येता येत नाही. सार्वजनिक ठिकाणावर गर्दी न करण्याचे आदेश असतात. सरकारी वाहन सुविधा बंद शिवाय सर्व खाजगी वाहनाच्या वाहतुकीवरही प्रतिबंध ! यामध्ये अत्यावश्यक सेवा मात्र अपवाद ठरतात.

**३) कोविड काळात कोणाला बाहेर निघण्याची परवानगी**

पोलीस, डॉक्टर, परिचारिका, स्वच्छता कर्मचारी, शासकीय अधिकारी, माध्यमांचे प्रतिनिधी, अत्यावश्यक सेवा पुरवणारे कर्मचारी, यांनाच लॉकडाऊनमध्ये बाहेर पडता येते. त्यांनीही सुरक्षिततेचे नियम पाळणे बंधनकारक असते. हे सारे कोरोनाविरुद्ध लढणारे कोरोना योद्धे आहेत. या योद्धांनी अगदी उन्हाळ्यात नको वाटणारे PPE Kit घालून तासनतास सेवा दिली.

**४) कोरोना योद्ध्यांचे योगदान**

देश कार्य ज्याचे पहिले काम ।
अशा कोरोनायोद्ध्यांना माझा सलाम ।।

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

डिसेंबर २०१९ मध्ये सर्वप्रथम सापडलेल्या कोरोनाच्या अतिसूक्ष्म विषाणूने जगभर थैमान घातले. या घातक, भयंकर, जीवघेण्या महामारी विरुद्ध लढण्यासाठी प्रत्येक देशात जसे कोरोना योद्धा सज्ज झाले तसे भारतातही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता केवळ देशसेवेचा विचार या कोरोना योद्धा यांनी केला. कोरोनाविरुद्ध लढाई जिंकण्यासाठी समाजातील अनेक घटक कोरोना योद्धा म्हणून कार्य करीत आहेत. त्यातील सर्वप्रथम कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणारे उच्चपदस्थ पोलीस अधिकारी आणि कर्मचारी हा महत्त्वाचा घटक आहे. त्यांनी जीवाची पर्वा न करता आपल्या घरादाराचा, सुखी संसाराचा त्याग करून संबंध देशातील कोरोना व्हायरसची साखळी रोखण्याचा यशस्वी प्रयत्न केला, लाॅकडाऊनमध्ये लागू करण्यात आलेल्या नियमावलीच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलिसांना कोरोनाचा सर्वाधिक संसर्ग झाला. सार्वजनिक स्तरावर कोरोनासंबंधी अंमलबजावणी पार पाडण्याचे कर्तव्ये(बंदोबस्त) आणि हे कर्तव्य निभावताना झालेली कोरोनाची लागण अशा दुहेरी आव्हानास पोलीस कर्मचारी तोंड देत आहेत. पोलीस कर्मचारी या संकटाचा जिद्दीने सामना करीत आहेत. आतापर्यंत साडेसहा हजार पोलिसांनी कोरोनाची लढाई जिंकली आहे तर सुमारे दोन हजार पोलीस सध्या कोरोनाशी दोन हात करीत आहेत मात्र दुर्दैवाने ९४ पोलीस वीरगतीस प्राप्त झाले आहेत. कायदा आणि सुव्यवस्था यांच्या बरोबरच महसूल खात्यातील अनेक पदाधिकारी, कर्मचारी यांनीही कोरोना योद्धांची दिवस - रात्र भूमिका पार पाडली आहे.

यानंतरचा दुसरा अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे डॉक्टर! डॉक्टर हा कोरोनायोद्धा आहे. आपल्या देशातील डॉक्टरांनी कोरोना रुग्णांवर उपचार करताना स्वतःची व स्वतःच्या कुटुंबाची पर्वा केली नाही. ते दिवस - रात्र कोरोना रुग्णांवर उपचार करण्यात व्यस्त आहेत. घड्याळाच्या काट्यावर धावणारे जग अक्षरशः जागेवरच थांबले. ही खरे तर एक शोकांतिका आहे. या कोरोना काळात काहींना आपला जीवही गमवावा लागला, तरीही हे कोरोनायोद्धे डगमगले नाहीत. लॉकडाऊनच्या काळात ते चोख ऑनड्युटी चोवीस तास राहिल्यामुळे कोरोनावर मात करणे सोपे गेले.

एकीकडे काही लोक घरात बसून कोरोनाबद्दल तर्कवितर्क लावत होते. दूरदर्शन समोर बसून आज इतकी कोरोना बाधित रुग्णांची संख्या झाली, त्यातील इतके सक्रिय रुग्ण आहेत, आता इतके बाधित रुग्ण बरे झाले, आता इतक्या बाधित रुग्णांचा मृत्यू झाला, असा कोरोनाबाबतचा धावता आढावा(Corona commentary) घेत होते,तर दुसरीकडे हे कोरोना योद्धे प्रत्यक्ष रणमैदानात उतरुन कोरोनाशी लढत होते, झुंज देत होते. कोरोना काळात या सर्व लोकांना देव दिसले, ते आपल्या डॉक्टर, नर्सेस, सफाई कर्मचारी, पोलीस यांच्या रुपात! या काळात डॉक्टरांनी कोरोना प्रतिबंधक लसरुपी अमृताचा डोस देऊन आणि अमृत पाजून लोकांना जीवनदान दिले. आयसीयूमध्ये तडफडणाऱ्या पेशंटला वाचवताना प्राणपणाला लावला. त्यांनी पीपीई किट घालून तासन् तास सेवा दिली. हे सर्व कोरोनायोद्धे आघाडीवर राहून कोरोनाची साखळी तोडण्यासाठी कोरोनाच्या पुढे पुढे लक्ष्मणरेषा ओढण्याचा खेळ खेळत होते आणि आपल्याला सुरक्षित ठेवत होते. कोरोनामुळे बाजार बंद झाले, रस्ते निर्मनुष्य झाले होते, शाळा- महाविद्यालये, कार्यालये बंद झाले, ईश्वराची पूजाअर्चा, प्रार्थना बंद झाली परंतु

दवाखाने मात्र सुरू होते. हे कोरोना योद्धे आपण शांत झोपेत असतानासुद्धा जागे राहिले. आपल्या ठिकाणी असणाऱ्या धैर्य आणि ताकदीने हे कोरोना योद्धे माणूस आणि माणुसकी वाचवीत होते. पुण्यामध्ये रणजीत निकम या डॉक्टरच्या रूपाने अतिशय सेवातत्पर आणि सच्चा कोरोना योद्धा समोर आला आहे. एका ७१वर्षाच्या वयोवृद्ध कोरोना बाधित रुग्णाला हॉस्पिटलमध्ये पोहोचवण्यासाठी पुण्यातील या तीस वर्षीय डॉक्टरने स्वतः ॲम्ब्युलन्स चालविली. एवढेच नाही तर वेळेत हॉस्पिटलमध्ये पोहोचून त्या रुग्णाचे प्राणही वाचविले. रणजीत निकम यांच्याप्रमाणे असंख्य कोरोना योद्धांनी वेगवेगळे कार्य करून आपल्या प्राणाची बाजी लावली. सर्वजण म्हणतात, डॉक्टर हे देवाचे दुसरे रूप आहे. ते 'याचि देही। याचि डोळा' मला पहायला मिळाले. डॉक्टरांनी कोरोना रुग्णांवर उपचार करताना स्वतःची व स्वतःच्या कुटुंबाची पर्वा केली नाही. ते दिवस - रात्र कोरोना रुग्णांवर उपचार करण्यात व्यस्त आहेत. ड्युटीवर असताना कित्येक डॉक्टरांना कोरोनाची लागण झाली व काहींना तर प्राणही गमवावा लागला. दिल्लीतील बेगमपूर या हॉस्पिटलमधील कोरोना योद्धा सुप्रसिद्ध डॉक्टर जावेद अली हे याचे ज्वलंत उदाहरण आहे.

महाराष्ट्रात सरकारने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम राबविली. या मोहिमेची अंमलबजावणी करताना प्रत्येक नागरिकाची घरोघरी जाऊन तपासणी करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. कोरोनाचे रुग्ण सापडल्यास ती इमारत आणि परिसर सील करणे, सॅनिटाईझ करणे, फलक लावणे हे काम डॉक्टर बरोबरच नर्सेस, आरोग्य कर्मचारी, सफाई कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका इत्यादींनी 'कोरोना योद्धा' म्हणून विशेष भूमिका बजावत केले आहे.

कोरोना योद्धा हे वेगवेगळ्या कार्यातून पुढे येऊ लागले. राष्ट्रीय टास्क फोर्स आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) या दोन संस्थांची स्थापना करण्यात आली. संरक्षण संशोधन आणि विकाससंस्थेने (DRDO) अवघ्या पंधरा दिवसात प्रयोगशाळा उभी केली. या प्रयोगशाळेत एका दिवसात हजारों चाचण्या होऊ लागल्या. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने कोरोनाविरोधात वापरल्या जाणाऱ्या उपकरणांची निर्मिती अल्पावधीतच केली. महत्त्वाचे म्हणजे या राष्ट्रीय टास्क फोर्सने हायड्रोक्सीन क्लोरोक्विनोन हे मलेरिया वरील जुने परंतु प्रभावी आणि स्वस्त औषध कोरोना आजारावर गुणकारी औषध म्हणून वापरण्याची शिफारस केली.

आर्थिक चक्रे थांबली असली तरी जगाचा पोशिंदा नाही थांबला ! सरकार - पोलीस यांना विनंती करून गेटवर आपल्याला वेगवेगळे भाजीपाला, दुध पुरविणारे शेतकरी आणि शेतमजुर,औषधांचा वेळेत पुरवठा करणारे मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह आणि मेडिकल स्टोरचे दुकानदार हे कोरोनायोद्धा आहेत. ज्या वेळेस सरकारने लॉकडाऊन घोषित करून सर्वांना घरामध्येच राहणे बंधनकारक केले होते. त्या काळामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन अध्ययन करणारे, ज्ञान देणारे शिक्षक-प्राध्यापक हे कोरोनायोद्धा आहेत.

**५) समारोप**

कोरोना हे एका विषाणू समूहाचे नाव आहे. हे विषाणू भारताला पूर्वीपासून माहीत आहेत. २००३ मध्ये आढळलेला ' सार्स ' हा आजार किंवा २०१२ मध्ये आढळलेला ' मर्स ' आजार हे सुद्धा कोरोना विषाणूमुळे होणारे

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आजार आहेत. परंतु डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या वुहान शहरात सुरू झालेल्या या उद्रेकामुळे जो कोरोना विषाणू आढळला तो यापूर्वीच्या कोरोना विषाणूपेक्षा वेगळा आहे. म्हणून त्याला नॉवेल अर्थात नवीन कोरोना विषाणू असे संबोधण्यात येते. जागतिक आरोग्य संघटनेने या आजारावर ' कोविड - १९ ' असे नाव दिले आहे. कोरोना हा प्राणी जगतातून मानवाकडे आलेला विषाणू आहे. तो मुख्यत्वे वटवाघळामध्ये आढळतो. बेसुमार जंगलतोड, वाढते शहरीकरण, कच्चे मांस खाण्याची सवय इत्यादी कारणांमुळे प्राणी जगतातील सूक्ष्मजीव मानवामध्ये प्रवेश करतात. हा आजार शिंकण्या - खोकल्यातून ते थेंब बाहेर पडतात त्यातून पसरतो. याशिवाय शिकण्या - खोकल्यातून उडालेले थेंब आजूबाजूच्या पृष्ठभागावर पडतात अशा पृष्ठभागाला स्पर्श केल्याने हे थेंब हाताला चिकटतात आणि हाताने वारंवार चेहरा, डोळे, नाक चोळण्याच्या सवयींमुळेदेखील हा आजार पसरू शकतो. कोरोना विषाणू आजारावर कोणतेही औषध अथवा लस उपलब्ध नाही. त्यामुळे रुग्णास त्याच्या लक्षणांनुसार उपचार केले जातात.

## ६) संदर्भ

*Government of Maharashtra COVID -19 Lockdown order,1.1 The Epidemic Diseases Act 1897, 1.2 The Disaster Management Act 2005, 1.3 Government Notification Public Health Department No.Corona-2020/CR- 58 / Aarogya - 5, Dated -13th March 2020, 14th March 2020, 15th March 2020*

*माहिती पुस्तिका सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग पुणे द्वारा प्रकाशित पृ. १-२३*

*शेजवळ मिलिंद - कोरोना फॅमिली डॉक्टरच्या चष्म्यातून संगणक प्रकाशन, अंबरनाथ, मार्च २०२१*

*डॉ राजेश पारिख (अनु) मिलिंद शेजवळ- दि कोरोना वायरस - संगणक प्रकाशन, अंबरनाथ, मार्च २०२१*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*